


# ।। भर दे मेरी झोली ।।

हे स्वामीराजा हे कृपाळा
मला ध्यानमूर्ती दिसू देई डोळा
कुठे माय माझी म्हणे बाळ जैसा
समर्था तुम्हाविण हो जीव तैसा ।।धृ।।
ॐभिक्षाम् देही हे गुरुस्वामी
तेरे आशीर्वाद से भर दे मेरी झोली
युगयुगांतर से रहे ना कभी खाली ।।१।।
महाशक्ती जेथे उभ्या ठाकताती
जिथे सर्वसिध्दी पदी लोळीताती
असे सर्व सामर्थ्य तो हा समर्थ
परब्रह्म साक्षात गुरुदेव दत्त
ॐभिक्षाम् देही हे गुरुस्वामी
तेरे आशीर्वाद से भर दे मेरी झोली
युगयुगांतर से रहे ना कभी खाली ।।२।।
ब्रह्म हा जणू रेणू या जगाचा
असे तो पाहुणा या नाटकी नियतीचा
त्यावरी बैसोनी पाहुनी कला सुकुमार
प्रत्यक्ष परब्रह्म गुरुदेव दत्तावतारं
ॐभिक्षाम् देही हे गुरुस्वामी
तेरे आशीर्वाद से भर दे मेरी झोली
युगयुगांतर से रहे ना कभी खाली ।।३।।
भिक्षा मागण्या हेतूनी आलो मी तुझपाशी
आई तू न ठेवोनी भरभरुन देशी
ठेवा हा रिध्दीसिध्दी चौसष्ट कलादिकांचा
करोनी वर्षाव रौप्य हिरे पाचू माणिक्याचा
ॐभिक्षाम् देही हे गुरुस्वामी
तेरे आशीर्वाद से भर दे मेरी झोली
युगयुगांतर से रहे ना कभी खाली ।।४।।
अजानूबाहू दिव्यकांती सतेज
नसे मानवी देह हा स्वामीराज
मुखावरी तयांच्या सतत स्मितहास्य
जे उलगडती या जीवांचे नवनविन रहस्य
ॐभिक्षाम् देही हे गुरुस्वामी
तेरे आशीर्वाद से भर दे मेरी झोली
युगयुगांतर से रहे ना कभी खाली ।।५।।

"भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे"
हेची जाणुनी पाहा
दयेची कृपेचीच ती शुध्द मूर्ती
प्रभा फाकली त्या स्वामी योगेश्वराची
ॐ भिक्षाम् देही हे गुरुस्वामी
तेरे आशीर्वाद से भर दे मेरी झोली
युगयुगांतर से रहे ना कभी खाली ।।६।।
मी बापुडा या जगात अर्चितो तुझपाशी
तुची खरा मायबाप भरुनी अंश-अंशी
जिथे तुमचीच दोनही कमल सुवर्णपाद
करी कृपा मजवरी घालितो मी साद
ॐ भिक्षाम् देही हे गुरुस्वामी
तेरे आशीर्वाद से भर दे मेरी झोली
युगयुगांतर से रहे ना कभी खाली ।।७।।
येथे चालतो सावळा खेळ भूत-प्रेतादिकांचा
सोडूनी हा भवपाश घेऊनी अवतार स्वामींचा
असे हे स्वामी दयाळू कृपाळू, मायाळूच फार
ऐकली आहे अगम्य ती तुझीच कीर्ति अपरंपार
ॐ भिक्षाम् देही हे गुरुस्वामी
तेरे आशीर्वाद से भर दे मेरी झोली
युगयुगांतर से रहे ना कभी खाली ।।८।।
स्वामी समर्थ निरंजन मायावी तो दिगंबर
यतीराज नवग्रहांचा स्वामीराज असोनी तो यतिश्वर
तुझे बाळ पाही तुझीच वाट देवा
घालुनी मज भिक्षा शिरी वरदहस्त ठेवा
ॐ नमो गुरुस्वामी तेरे आशीर्वाद से भर दे मेरी झोली
युगयुगांतर से रहे ना कभी खाली ।।९।।
अशी ही भिक्षा घेऊनी संतोष पावलो मी
गळे ऋण दारिद्र्याचा चढे वर्क आनंदाचा
विटले पाप, भोग, ऋण, दारिद्र्य जन्मजन्मांतरीचे
पाहुनी दिव्य अवतार
स्वामीराज ते अक्कलोटीचे ।।१०।।
श्री स्वामी समर्थाऽर्पणमस्तु

शुभं भवतु । शुभं भवतु । शुभं भवतु ।